# NAGPUR CITY POLICE COMMISSIONERATE

नागपूर शहर पोलीस आयुक्तालय

**(पोलीस वार्तापत्र)**

**(सायंकाळ)**

**दिनांक ०८.०९.२०२६ मंगळवार**

**१) मा. पोलीस आयुक्त नागपुर शहर यांचे प्रमुख पाहुणे म्हणुन उपस्थीतीत शिक्षक दिन सोहळा संपन्न :—**

दिनांक ०८.०९.२०२६ रोजी सकाळी ११.०० वा. सेवादल महीला महाविद्यालय, येथे आयोजीत भव्य शिक्षक दिन सोहळ्यात मा. श्री विश्वास नांगरे पाटील, पोलीस आयुक्त नागपूर शहर हे प्रमुख पाहुणे म्हणुन उपस्थित होते. मा. पोलीस आयुक्त यांनी त्यांचे प्रमुख भाषणात उपस्थित शिक्षकांना उद्देशुन ''शिक्षक हे चारीत्र्याचे शिल्पकार व राष्ट्रनिर्माते'' असल्याचे म्हटले व शिक्षक हे मानवी क्षमतेचे खरे शिल्पकार असल्याचे व संयमाने ते विद्यार्थ्यांचे बुध्दीची जडण—घडण करून, त्यांचे जिवनाला योग्य आकार देत असल्याचे सांगीतले. त्यांनी प्रेमभावना, इतरांना मदत करण्याची तत्परता व सेवा करण्याची बांधीलकी जपली पाहीजे असे प्रतीपादन केले. मा. पोलीस आयुक्त यांनी विद्यार्थीनिंना मोठी स्वप्ने पाहण्याचे आवाहन करून, स्वतःचे कौशल्य विकसित करून वैयक्तीक तसेच, शैक्षणिक क्षेत्रात उल्लेखनिय कामगिरी करून संस्थेचे नांव उज्वल करावे तसेच, आई, शिक्षक व आदर्श व्यक्ती यांना सदैव सर्वोच्च मान द्यावा व आपली स्वप्ने कधीही विसरू नये, असा मोलाचा सल्ला दिला. मा. पोलीस आयुक्तांनी डॉ. ए.पि.जे. अब्दुल कलाम यांचे विचाराचा संदर्भ देवुन, मनामध्ये सदाचारांची मुळे रूजविल्यास उत्तम चारीत्र्य विकसित होते. व त्यातुन चांगला समाज घडतो असे सांगीतले.

कार्यक्रमामध्ये गुणवत्ताप्राप्त विद्यार्थीनींचा तसेच, पि.एच.डी. प्राप्त संशोधकांचा सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाला संस्थेचे अध्यक्ष, संस्थापक, प्राचार्य व प्राध्यापक शिक्षकवर्ग व शेकडोंच्या संख्येने विद्यार्थीनी उत्स्फुर्तपणे हजर होत्या.




**२) मा. न्यायालयातुन आरोपींना १० वर्ष सश्रम कारावासाची शिक्षा :—**

दिनांक ०९.०८.२०२६ रोजी मा. जिल्हा व अति. सत्र न्यायाधीश—१३ तथा विशेष न्यायाधिश पोक्सो कोर्ट, नागपुर, श्री. एन. आर. तळेकर साहेब यांनी त्यांचे कोर्टाचे विशेष केस क्र. ३६२/२०२१ मधील, पोलीस ठाणे मानकापुर येथील अप. क्र. एम. केस ४४/२०१९ कलम ३०७, ३७६, ३७९, ४२०, ४०६, ४९३, ४९८, ५०६, १२०(ब) भा.दं.वि., सहकलम ४३ आय.टी.ॲक्ट या गुन्ह्यातील आरोपी १) अजय माधवराव कुंभारे, वय ४९ वर्षे, २) सौ. सविता अजय कुंभारे, वय ४८ वर्षे, दोन्हीही रा. प्लॉट नं. ७५२, त्रिमुर्ती नगर,

वर्धमान नगर, नागपूर यांचेविरूध्द साक्षी पुराव्याअंती गुन्हा शाबीत झाल्याने, **आरोपी क्र. १ व २ यांना कलम १२०(ब) भा.दं.वि. कायद्यान्वये १० वर्षे सश्रम कारावासाची शिक्षा व प्रत्येकी १०,०००/— रू. दंड आणि दंड न भरल्यास ०६ महीने अतिरीक्त कारावासाची शिक्षा तसेच, आरोपी क्र. १ यास कलम ४९३, ३७६ भा.दं.वि. कायद्यान्वये १० वर्षे सश्रम कारावासाची शिक्षा व १०,०००/— रू. दंड आणि दंड न भरल्यास ०६ महीने अतिरीक्त कारावासाची शिक्षा तसेच, आरोपी क्र. १ यास कलम ५०६, ३२३ भा.दं.वि. कायद्यान्वये ०१ वर्षे सश्रम कारावासाची शिक्षा व १,०००/— रू. दंड आणि दंड न भरल्यास ०२ महीने अतिरीक्त कारावासाची शिक्षा ठोठावली.**

दिनांक ०७.०९.२०१६ ते दिनांक ०२.०२.२०१८ चे दरम्यान, पोलीस ठाणे मानकापुर हद्दीत राहणाऱ्या ३९ वर्षीय फिर्यादी यांचेसोबत यातील आरोपींनी संगणमत करून, फिर्यादीचे घरी जावुन, आरोपी क्र. १ याने शितपेयातुन गुंगीकारक पदार्थ मिळवुन तीचेशी जबरीने संभोग केला. तसेच, त्यांचे आक्षेपार्ह फोटो काढले व कुणाला काहीही सांगीतल्यास खोटे गुन्ह्यात अडकविण्याची धमकी देवुन स्वत:सोबत राहण्यास भाग पाडले. आरोपीनी फिर्यादीचे एटीएम कार्डचे पासवर्ड घेवुन, त्याद्वारे १,७३,०००/—रू. काढुन तसेच, आलमारीतील रोख ५,००,०००/—रू. असे एकुण ६,७३,०००/—रू. चा मुद्देमाल चोरी केला व फिर्यादीचे दागिणे घेतले. तसेच, फिर्यादीचे बहीणीशी खोटे बोलुन रक्कम घेतली. फिर्यादीने रक्कम व दागिणे परत मागितले असता, फिर्यादीस जीवे ठार मारण्याची धमकी दिली. फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे मानकापुर येथे आरोपीविरूध्द गुन्हा नोंदविण्यात आला होता. आरोपींना दिनांक ०६.०१.२०२१ रोजी अटक करण्यात आली होती.

गुन्ह्याचे तपासी अधिकारी तत्कालीन वपोनि. श्री. गणेश ठाकरे यांनी मा. कोर्टात तपासाअंती दोषारोपपत्र सादर केले होते. सदर खटल्यात सरकारी अभियोक्ता म्हणून ॲड. श्रीमती दिपाली गवळी यांनी तर, आरोपीतर्फे ॲड. श्री. चेतन ठाकुर यांनी काम पाहिले. सदर गुन्ह्यात कोर्ट पैरवी अधिकारी मपोहवा. स्वाती बोरकर, पोहवा. जफरूद्दीन काझी यांनी काम पाहिले.

**३) पोलीस आयुक्तालय अंतर्गत, गुन्हेगारांचा आदान—प्रदान कार्यक्रम संपन्न :—**

दिनांक ०८.०९.२०२६ चे ११.०० वा., मा. पोलीस आयुक्त श्री. विश्वास नांगरे पाटील यांचे संकल्पनेतुन व मार्गदर्शनाने नागपूर पोलीस आयुक्तालय अंतर्गत विविध पोलीस ठाणे येथे अटक व मा. न्यायालयाकडून पोलीस कोठडी प्राप्त असणारे एकूण १४ अटक आरोपींचे आदान—प्रदान हे डिटेक्शन कार्यालय, नागपुर शहर, काटोल रोड येथे पार पडले. आदान—प्रदान कार्यक्रमाचा मुळ उद्येश हा पोलीस अधिकारी व अंमलदार यांना आरोपींची ओळख पटावी, आरोपींची गुन्हे पध्दती समजण्यास मदत व्हावी तसेच, त्याचेवर कोणकोणते, किती व कुठे गुन्हे दाखल आहेत याबाबत माहितीचे आदान—प्रदान सुलभरितीने करता यावे असा होता. कार्यक्रम प्रसंगी मा. श्री. राजेंद्र दाभाडे, अपर पोलीस आयुक्त (गुन्हे), मा. श्री. दीपक अग्रवाल पोलीस उपआयुक्त (डिटेक्शन), व मा. श्री. वैभव जाधव, सहायक पोलीस आयुक्त (गुन्हेशाखा), श्री. आनंद बिचेवार (पोनि. भुमाफीया पथक) हे उपस्थित होते. तसेच, एकूण २८ पोलीस ठाणे येथील अधिकारी व अंमलदार आणि आरोपींना अटक करणारे व हजर आणणारे संबंधीत पोलीस ठाणेंचे ठाणेदार, तपास पथक व एमओबी पथकातील अधिकारी व अंमलदार हजर होते. दिनांक १४.०७.२०२६ पासुन आजपावेतो एकूण १८३ अटक आरोपीतांना आदान—प्रदान मोहीमेकरीता हजर करण्यात आलेले आहे.

कार्यक्रम प्रसंगी मा. अपर पोलीस आयुक्त (गुन्हे) यांनी सीसीसी द्वारे चालणारी कार्यपध्दती त्याचप्रमाणे सिम्बा ॲप प्रणाली समजून घेवुन, हजर आरोपींची इत्यंभुत माहिती सिंबा प्रणालीमध्ये वेळीच अद्ययावत करण्याबाबत, त्याचप्रमाणे आरोपींचा डोजीअर फार्म, फिंगरप्रिंटस्, मोडस ऑपरेंडी याबाबत माहिती प्राप्त करुन

संकलित करावी. अटक आरोपीतांवर योग्य त्या प्रतिबंधक कार्यवाही कराव्यात अशा हजर ठाणे प्रभारी व तपासी अधिकारी व अंमलदार यांना सुचना दिल्या.

**(कामगिरी)**

**१) अजनी पोलीसांची कामगिरी :— कुख्यात गुंड हद्दपार**

पोलीस ठाणे अजनी हददीत **गल्ली नं. २/एल, चंद्रमणी नगर, अजनी, नागपुर येथे राहणारा गुन्हेगार ईसम नामे शुभम उर्फ शिव सुरज बालगृहेर, वय २३ वर्षे** याचेविरूध्द पोलीस ठाणे अजनी, हुडकेश्वर, सिताबर्डी हद्दीत, अपहरण, जबरी चोरी, दरोडा, दुखापत, शिवीगाळ करणे, घरफोडी करणे, दंगा करणे, शस्त्र बाळगणे इत्यादी गंभीर स्वरूपाचे विविध गुन्हे दाखल असुन, त्याचेवर वारंवार कारवाई करूनही त्याचे प्रवृत्तीत कोणतीही सुधारणा झाली नाही. नमुद गुन्हेगार इसमाचे वर्तणुकीत सुधारणा व्हावी, याकरीता अजनी पोलीसांनी आरोपीविरूध्द हद्दपार प्रस्ताव तयार करून, मा. पोलीस उपायुक्त, परिमंडळ क्र. ०४, नागपुर शहर याचेकडे सादर केला. मा. श्रीमती रश्मीता राव पोलीस उपायुक्त, परिमंडळ क्र. ०४, नागपुर शहर यांनी हददपार आदेश क्र. १५/२०२६ दिनांक ०२.०९.२०२६ अन्वये गुन्हेगारास नागपूर शहर व नागपुर ग्रामीण हद्दीतून ०२ वर्षाकरीता हद्दपार करण्याचा आदेश पारीत केला. नमुद गुन्हेगाराचे हद्दपार आदेशाची अंमलबजावणी करण्यात आली असुन, अजनी पोलीसांनी नमुद हद्दपार इसमास दिनांक ०२.०९.२०२६ रोजी त्याचे नातेवाईक यांचेकडे काचुर्ना, पो.ठाणे वरूड, जि. वरूड येथे सोडलेले आहे.

वरील कामगिरी वपोनि. नितीनचंद्र राजकुमार यांचे मार्गदर्शनाखाली, पोउपनि. संतोष वाघमारे, पोहवा. ओमकार बाराभाई, रविंद्र लांडे, पोअं. चित्रसेन गजभिये, मपोअं. सिमा भोयर यांनी केली.

**२) गुन्हेशाखा युनिट क्र. १ पोलीसांची कामगिरी :— हद्पार ईसमास अटक.**

दिनांक ०८.०९.२०२६ चे १०.१५ वा. चे सुमारास, गुन्हेशाखा युनिट क्र. १ चे अधिकारी व अंमलदार हे आरोपींचे शोधार्थ व हद्यपार आरोपी चेक करीत असता, मिळालेल्या माहीतीवरून, पोलीस ठाणे एमआयडीसी हद्यीत, रचना रिंगरोड, मेट्रो स्टेशन परिसरात मिळालेल्या वर्णनाच्या हद्दपार ईसमास ताब्यात घेवुन, त्याचे नांव पत्ता विचारले असता, त्याने आपले नांव शुभम उर्फ दद्दु सहदेव प्रधान, वय ४४ वर्षे, रा. आयसी चौक, गेडाम ले—आऊट, हिंगणा रोड, नागपुर असे सांगीतले. आरोपीचा अभिलेख तपासला असता, त्यास पोलीस उप आयुक्त परीमंडळ क्र. ०१ यांचे हद्दपार आदेश क्र. १२/२०२४ दिनांक २८.११.२०२४ अन्वये नागपुर शहर व ग्रामीण हद्दीतुन ०२ वर्षाकरीता हद्दपार केल्याचे दिसुन आले. आरोपी हा हद्दपार असतांना कोणतीही परवानगी न घेता पोलीस ठाणे एमआयडीसी हद्दीत कोणतातरी गुन्हा करण्याचे उद्देशाने समक्ष मिळुन आल्याने व त्याने मनाई आदेशाचे उल्लंघन केल्याने, पोलीस ठाणे एमआयडीसी येथे आरोपीविरूध्द कलम १४२ म.पो.का. अन्वये गुन्हा दाखल करून, आरोपीस अटक केली आहे. आरोपीस पुढील कार्यवाहीस्तव एमआयडीसी पोलीसांचे ताब्यात देण्यात आले आहे. पुढील तपास सुरू आहे.

वरील कामगिरी मा. श्री. राजेंद्र दाभाडे अपर पोलीस आयुक्त (गुन्हे) नागपूर शहर, मा. श्री. दीपक अग्रवाल, पोलीस उप आयुक्त (डिटेक्शन), मा. श्री. वैभव जाधव, सहा. पोलीस आयुक्त (गुन्हेशाखा) यांचे मार्गदर्शनाखाली, पोनि. प्रशांत ठवरे, सपोनि. राजाभाऊ जाधव, पोउपनि. ओमप्रकाश कोठे, पोहवा. प्रितम यादव, व पोअं. पंकज ठवकर यांनी केली.

**(गुन्हे)**

**पोलीस ठाणे कळमना :— प्राणांतिक अपघात करणाऱ्या आरोपीविरूध्द गुन्हा दाखल.**

पोलीस ठाणे कळमना हद्दीत, प्लॉट नं. ५३, वांजरा ले—आऊट, देवि नगर, कळमना, नागपुर येथे राहणारी फिर्यादीची मुलगी नामे कु. रूपश्री प्रेमराज पटले, वय २१ वर्षे ही दिनांक ०८.०९.२०२६ चे ०९.५५

वा. ते १०.३० वा. चे दरम्यान, तीचे ज्युपीटर मोपेड क्र. एम.एच. ३१ एफव्ही ४१९३ ने घरून तीचे नर्सिंगचे कामावर एस हॉस्पीटल, दिघोरी येथे जात असता, पोलीस ठाणे कळमना हद्दीत, चिखली उड्डाणपुलावर कोणीतरी अज्ञात वाहनाचे चालकाने त्याचे ताब्यातील वाहन भरधाव वेगाने, निष्काळजीपणे व धोकादायकरित्या चालवुन फिर्यादीचे मुलीचे मोपेडला धडक देवुन, पळुन गेला. गंभीर जखमी अवस्थेत मुलीला उपचाराकरीता मेयो हॉस्पीटल येथे नेले असता, उपचारादरम्यान डॉक्टरांनी तपासुन तीला मृत घोषीत केले.

याप्रकरणी फिर्यादी प्रेमराज राजाराम पटले, वय ४० वर्षे, रा. प्लॉट नं. ५३, वांजरा ले—आऊट, देवि नगर, कळमना, नागपुर यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे कळमना येथे पोउपनि. निलेश घोगरे यांनी अज्ञात वाहन चालक आरोपीविरूध्द कलम १०६(१) भा.न्या.सं. अन्वये गुन्हा दाखल केला आहे. आरोपीचा शोध व पुढील तपास सुरू आहे.

**(मिसिंग)**

**पोलीस ठाणे नविन कामठी :—** धम्मानंद हिरदास लांजेवार, वय ४५ वर्षे, रा. जुनी खलाशी लाईन, कादर झेंडा जवळ, कामठी, नागपूर हे दिनांक २०.०८.२०२६ चे १९.०० वा. पोलीस ठाणे नविन कामठी हद्दीतील राहते घरून कामाला घोरपड येथे जातो असे सांगुन कुठेतरी निघुन गेले. घरी परत आले नाही. त्यांचा शोध घेतला असता मिळून आले नाही. **वर्णन** रंग— सावळा, चेहरा— लांबट, बांधा— सडपातळ, उंची— ५ फुट १० इंच, डोळे—काळे, केस— काळे, अंगात—शर्ट व पॅन्ट घातलेला आहे. भाषा— हिंदी/मराठी बोलतात.



धम्मानंद

**स्वा/—**
**( नितीन चुलपार )**
**सहा.पोलीस निरीक्षक,**
**पोलीस जनसंपर्क अधिकारी,**
**नागपुर शहर.**